Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 135 – 139

DOI: 10.5281/zenodo.10115192

Original Research Article

# महात्मा गांधी यांचे अहिंसा विषयक विचार

श्री येगावकर मुकुंद[1*], डॉ. अरविंद सोनटक्के[2]

[1]राज्यशास्त्र विभाग, दिगंबरराव बिंदू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भोकर जि. नांदेड ४३१८०१ महाराष्ट्र, भारत

[2]इतिहास विभाग, दिगंबरराव बिंदू कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भोकर जि. नांदेड ४३१८०१ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: [1]yegaonkarmb@gmail.com

Received: 10 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 28 October, 2023

## प्रस्तावना

महात्मा गांधी यांच्या आयुष्याचे जर मर्म कोणते असेल तर ते म्हणजे अहींसा होय गांधीजी आपल्या आयुष्यात केवळ अहीसावादा साठी वैचारिक संघर्ष करत आले, ते म्हणतात मी स्वप्नवादी नाही मी स्वतःला व्यावहारिक आदर्शवाद मानतो अहींसा केवळ ऋषीमुनी संतांसाठी नसून सर्वसामान्यांसाठी देखील आहे गांधीजी म्हणतात त्याप्रमाणे हींसा ही पशुचा जीवन जगण्याचा मार्ग आहे तसाच मानवी जगण्याचा मार्ग हा अहिंसा आहे पशु केवळ हींसेचे नियम जाणतात तर मानवी वृत्ती ही आत्म्याच्या बळावर असून ती आत्म्याच्या नियमाचे पालन करते ज्यानी अहिंसा वृत्ती शोधली असेल तो न्यूटन पेक्षाही महान असेल प्रभावशाली असेल गांधीजी यंग इंडिया मध्ये असे म्हणतात की "मी अहींसे ची दीक्षा ही माझ्या पत्नी तिच्याकडून घेतली मी तिला माझ्या इच्छेनुसार वागण्यास भाग पाडत असे, एकीकडे तिला हा माझ्या वागण्याचा होणारा त्रास तर दुसरीकडे माझे हे सगळे वागणे पाहून माझी मलाच लाज वाटली. व मी ठरवले हे सगळे करण्यासाठी माझा जन्म झालेला नसुन मला माझ्यावर नियंत्रण ठेवावायास हवे याचा परिणाम शेवटी ती माझी गुरु झाली."

**महत्वाचे शब्द:** भुत दया, अहिंसा, प्रेम भाव

## उद्दिष्ट

१. अहिंसा या संकल्पनेचा गांधीजीना अभिप्रेत अर्थ शोधणे.
२. अहींसा म्हणजे केवळ दुबळेपना नव्हे.
३. अहींसेचे वर्तमांकालीन महत्व शोधणे.
४. अहींसा हि शाररीक व मानसीक याचा सह संबंध शोधणे.

**गृहितक**

१. अहींसा हि केवळ रक्तपाता पुरती मर्यादीत नाही.
२. अहिंसा ही दुबळ्याची नसुन शुरांची आहे.
३. अहींसा ही विचारसरणी आहे.
४. अहींसा ही केवळ आर्दर्शवादी नसुन व्यावहारीक आहे.

कोणाचीही हींसा न करणे कोणत्याही प्राण्यांना कष्ट न देणे होय सर्व भुतेष सयम: याचा अर्थ असा की सर्वांप्रती सयमभाव राखणे होय". केवळ वध न करणे हि अहिंसा नाही तर याचा व्यापक अर्थ असा की मन, वाचा व कर्म यातून कुणास ही कष्टी न होऊ देणे हा अहींसेचापूर्ण भाव आहे पण त्याचे स्वरुप मात्र नकारात्मक आहे. सकारात्मक स्वरूपात सार्वत्रिक प्रेम रूप आहे अती प्राचीन काळापासून भारतामध्ये तो प्रवाहित आहे महात्मा गांधीजींना हिंसेकडे अकर्षित करण्याचे श्रेय लिओ टॉलस्टॉय यांना जाते ज्यांच्या विचाराच्या कृतीने त्यांच्या मनात अहिंसे बद्दल आपुलकी निर्माण झाली गांधीजी म्हणतात "ज्यांच्या ग्रंथांचा माझ्या वैचारिक जीवनावर जो योग्य संस्कार झाला तो ग्रंथ म्हणजे "किंग्डम ऑफ गॉड विदिन" यू म्हणजे ईश्वराचे राज्य हे तुमच्या हृदयात आहे मी सुद्धा हिंसक होतो पण अहिंसेचे संस्कार झाल्यानंतर मात्र माझे हृद्य अहिंसक बनले प्रेमाने ओथंबले". तसेच रामचंद्र भाई यांचा देखील गांधीजींच्या जीवनावर प्रभाव होता गांधीजी असे माणत की अहिंसा ही केवळ शारीरिक असत नाही ती मनात म्हणजे अंतकरणातून प्रसवते 'अहिंसा' ह्या ग्रंथात ते म्हणतात "जगातील सर्व प्राणीमात्र एक आहेत जेथे कोणत्याही प्राणीमात्राशी संबंध येतो त्यावेळी त्यांना हानी पोहोचवणे म्हणजे हिंसा होय" एवठेच नव्हे तर तसा विचार करने सुद्धा हींसा होय. गांधीजींच्या मते मनुष्य स्वतः अशी ऊर्जा निर्माण करील की ज्यामुळे वाघ अस्वल यासारख्या प्राण्याला सुद्धा आपल्या स्नेहाने अंकित करू शकतो.

अहींसा आणि सत्य यातील सहसंबंध या संदर्भाने गांधीजींनी आपले मत स्पष्ट केले आहे सत्य सर्वात मोठे व उच्य स्वरूपाचा धर्म आहे, तर अहिंसा सर्वात मोठे कर्तव्य आहे, ते वेळोवेळी पार पाडल्यानंतरच व्यक्ती खऱ्या अर्थाने सत्य आपलेसे करू शकेल, याचाच अर्थ सत्य एक साध्य तर अहिंसा एक साधन आहे. अहिंसा आणि दया या संदर्भाने अनेक प्रश्न उपस्थित झाले ह्याच्या उत्तरादाखल गांधीजी खुलासा करतात की "अहिंसा आणि दया यात केवळ सोने व सोन्या पासून बनवलेले दागिने ह्यात जसे अंतर आहे किंवा बि व बीया यापासून तयार झालेला वृक्ष यातील अंतर होय म्हणजे दये शिवाय अहींसा अस्तित्वात येऊ शकत नाही पण अज्ञान व भय, पळपुटेपणातुन दाखवलेली दया हि अहींसा होउच शकत नाही." अखेरीस असे म्हणता येते की, दया अहींसे चा स्त्रोत आहे फक्त त्यास कायरता व भय यापासून दूर राहावयास हवे. जिवदया अंतरात्म्याचा गुण आहे पण हा विचार केवळ काही जीवांचा विचार करण्यापुरती मर्यादित नाही जर कोणी एखाद्या प्राण्याला की जे त्रासदायक होतात त्यांना पिंजऱ्यात बंद करून दुसरीकडे सोडतात याला अहिंसा म्हणत नाहीत ह्या प्रकारची दया कधीही अहिंसा होऊ शकत नाही.

**अहिंसेचे वैशिष्ट्य**

१. अहिंसा लिहिणे ही नसे पेक्षा श्रेष्ठ आहे कारण अहिंसक व्यक्तीची शक्ती ही त्यांच्या हिंसक व्यवहारापेक्षा श्रेष्ठ असते
२. अंतिमतः अहिंसेवरील विजय निश्चित असतो.
३. अहिंसे अंतर्गत मनुष्य सुलभरीत्या शुद्धी होत असते

४. मध्ये ह्या शब्दाला अर्थ नसतो तर अहिंसे मध्ये परी हिस्से मध्ये पराजय निश्चित असतो.
५. नेहमी करण्याच्या प्रवृत्तीवर अवलंबून असते
६. ईश्वर तसेच प्रेम यावर निष्ठा असणाऱ्या व्यक्ती व त्या पालक युवा स्त्री अथवा वृद्ध ह्यात का असेना त्या अहिंसेने सशक्त बनतात अहिंसेला जीवनधर्म मानल्यानंतर सर्वांचे जीवन अहिंसा मन होत असते
७. व्यक्ती तथा राष्ट्र यांनी अहिंसे प्रति आपले सर्वोच्च ठोकून दिली पाहिजे म्हणूनच आधुनिक साम्राज्यवाद हा अहिंसेचे सोबत जुळू शकत नाही उष्णतेचा पुरेशा झगे अत्यंत सचिन ठाकूर देखील विरघळतो त्याचप्रमाणे अहिंसेच्या पुरेशा पुस्तक येणे अत्यंत कठीण देखील पाहिजे ती उष्णता निर्माण करण्याची शक्ती अपार आहे.

दासगुप्ता यांच्या मते "हिंसेचे अनेक रुप असतात हिंसा कधी बलप्रयोगातून व्यक्त होते तर कधी आर्थिक शोषणाव्दारे बाहेर पडते खरे पाहता शोषण हिंसेचे सूक्ष्म पण भयंकर रूप आहे". हिंसेने हिंसा संपुष्टात येऊ शकत नाही, तर ती अधिक तीव्र होते तिचा प्रतिकार होऊ शकतो एक मनोवैज्ञानिक सत्य असे की, हिंसेच्या मुळाशी भय वास्तव्य करते. हिंसा ही मानवाच्या अंतर्निहित दुर्बलतेची अभिव्यक्ती असते यासाठी सर्वात पहिले मानवाने आपल्यातील दुर्बलता नष्ट केली पाहिजे तेव्हा तो भयापासून मुक्त होतो. हिंसा मानव धर्माच्या विरुद्ध आहे जो जीवन देऊ शकत नाही त्याला तो घेण्याचा अधिकारही नाही महात्मा कबीरा ने सुद्धा जिव हिंसा धर्मा विरुद्ध मानली आहे. त्याचा एक दोहा या संदर्भाने खूप प्रसिद्ध आहे "जीव वधत उरु धरम कहत हो, अधरम कहा है भाई आपन तो मुनिजन है बैठी, कासिन कहा कसाई. कबीर सुद्धा चैतन्य प्राण्या प्रतीची हिंसा यालाच हिंसा न मानता झाडे वेली यांना सुद्धा कष्ट देणे म्हणजे हिंसा आहे असे मानतात.

अहिंसा विज्ञान आहे शास्त्रही आहे याप्रकारे हिंसेसाठी प्रशिक्षण कला आवश्यक आहे त्या प्रकारे अहिंसे साठी मरण्याची कला अवश्यक आहे. हिंसा करून भयापासून मुक्ती मिळू शकत नाही, किंतु भीतीमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीतून मुक्तीसाठी चे साधन हे अहिंसे मध्ये आहे. अहिंसे मध्ये भयाला थाराच नसतो त्याला केवळ एकच भय असते ते म्हणजे ईश्वराचे. वस्तुंच्या रक्षणासाठी हिंसा आवश्यक वाटते पण जीवात्म्याच्या रक्षणासाठी मात्र आहींसा महत्त्वाची आहे.

**अहींसेचा व्यापक अर्थ**

दुसऱ्याच्या बाजूने विचार करावयाची सवय झाली आणि दुसऱ्याचाही विचार करण्यातच न्याय आहे हे पटले म्हणजे त्यातूनच व्यापक अहिंसेचा उदय होतो दुसर्याचे दुःख पाहून कळवळा वाटणे ही अहिंसेची प्राथमिक अवस्था आहे. त्यातूनच जीव दयेचा उदय होतो कित्येक धर्मानी जिवदये च्या कळवळयातुनच तिचा स्वीकार आणि प्रसार केला आहे, पण ते वर सांगितलेल्या व्यापक अहींसे पर्यंत कधीकधी पोहोचलेले नसतात सत्यनिष्ठ माणसाच्या शुद्ध आणि न्याय निष्ठेतून व्यापक अहिंसेचा उदय झालेला असतो. सत्य आणि अहिंसा ही दोन्ही जीवनसत्त्वे अगदी स्वतंत्र असले तरी त्याचा परस्पर संबंध घनिष्ठ गांधीजींनी एके ठिकाणी स्पष्ट केले आहे की सत्य हे मनुष्यासाठी स्वयंभू स्वतः सिद्ध आहे अहिंसा ही कमवावी लागते.

स्वतःच्या उत्कट निष्ठेमुळे दुसऱ्याच्या सत्यनिष्ठ त्याची कदर करण्याची तयारी होणे हीच गोष्ट येथे मुख्य आहे स्वतःचे सत्य सारखेच आहे तरीही त्याला स्वतःच्या जीवनात जगण्याचा पूर्ण अधिकार आहे असे म्हटल्यानंतर दुसऱ्यालाही जगण्याचा पूर्ण अधिकार आहे असे म्हटल्यानंतर ही दुसऱ्यालाही बसला अधिकार त्याच्या सापेक्ष त्याचा बातमी वाचून नाही एवढी गोष्ट वर सांगितल्यानंतर मनुष्य गांधीच्या अनुष्काच्या विचार करू शकतो माझ्या सत्यनिष्ठ ते

साठी मी सहन करणे जसे स्वाभाविक आहे योग्य आहे तसे माझे सापेक्ष सत्य दुसऱ्यावर लादण्याचा प्रयत्न करणे यात खरी सत्यनिष्ठा नाही.

मनुष्य निसर्गाची अदभूत कलाकृती आहे त्यात पशुता नाही असे नाही, पण मनुष्यात तीन-चार अशा गोष्टी आहेत की त्या त्याला पशूपासून वेगळे करतात मनुष्यात विवेक आणि निर्माण ह्या दोन शक्ती आहेत तसेच सर्व वस्तूंच्या गुणधर्माचा आणि ज्ञानाचा संग्रह करण्याची शक्ती मनुष्य प्रेमाचा भुकेला आहे व त्याच्या ठीकणी उत्कर्ष करण्याची शक्ती आहे व्यक्तीची सहजप्रवृत्ती आहे त्याकरता प्रेरणा प्रोत्साहन आणि संधी प्राप्त होण्याचा प्रश्न आहे या विधानाला प्रेम रुपी खत प्रोत्साहन रुपी पाणी आणि अवस्था रुपी आधार मिळेल तर हे बिल भरल्याशिवाय राहणार नाही.

महात्मा गांधी यांच्या एका कार्यकर्त्या महिला चा एक किस्सा खूप प्रसिद्ध आहे तो असाच त्या कार्यकर्त्या म्हणला म्हणतात "मी मोठ्या हिरीरीने वाद घालण्याची बापुजींची ठरवले बापूजींनी त्या मुलीची त्यांच्या कसोटीवर छाननी सुरू होईल त्यात ती महिला चार-पाच महिन्यांची गरोदर आहे हे लक्षात येतात सारे बिनसले तु आणलेली सत्याग्रही मी मंजूर करू शकत नाही कारण गरोदर आहे तेव्हा अहिंसेच्या माझ्या सिद्धांतात बसणार नाही मी त्याचे म्हणणे समजू शकत नव्हती गरोदर असली तर काय बिघडले याची अहिंसा कळतच नाही असे मी मनात म्हटले अवसान आणून मी विचारले श्रीकृष्ण नाही का जन्माला शिवाय त्या बाई विचार करूनच सत्याग्रह करीत आहे मी वाद घालत होते माझे म्हणणे ऐकून बापू म्हणाले की काय म्हणतो ते तुझ्या डोक्यात शिरत नाही माझी अहिसा अगदी सुख आहे मी इंग्रज सरकार विरोधी सत्याग्रह करतोय म्हणून याचा अर्थ असा नाही की ते अडचणीत येतील असे सत्याग्रही मी पाठवावे त्यांना शारीरिक व मानसिक उपद्रव होणार नाही ही माझी अहिंसा आहे.

**अहींसे चे महत्व**

१. अधुनीक जगतासाठी अहिंसा अत्यंत आवश्यक आहे यामुळे मानवाच्या अंतकरणात मनोवैज्ञानिक परिवर्तन होत असते आणि अपराधी भावना कमी होते.
२. अहिंसे द्वारा सर्वांचे कल्याण आणि ही भावना उत्पन्न होते याच्या आचरणामुळे निर्भयता स्पष्टता स्वतंत्र आणि सत्य यात वाढ होऊन तसेच अहिंसे मुळे प्रेम निष्ठा हे गुणही वृदिंगत होतात अहंकार दंभ खोटेपणा असहयोग आदी बाबींचाही अंत यामुळे होतो
३. अहिंसा हे एक शास्त्र आहे ज्याद्वारे एक थेंबही रक्ताचा न सांडता वर्ग विहिन समाज निर्माण होत गेला हेच अभिप्रेत आहे की जातीभेद वर्ण, वर्ग भेद नाहीसा होऊन प्रत्येक जण एक दुसऱ्याशी सदाचाराने व मानवतेने वागेल.
४. अहिंसा मानवाला हिंसेपासून मुक्त करते व वैमनस्य कलह क्रोध अहंकार शोषण हे सर्व हिंसेचे रूप आहेत मानवी मन ह्या सर्वांमुळे दुखी: होत असते यासाठी मग अहिंसेची आवश्यकता भासते.
५. कर्तव्याची जाणीव व त्याचे निर्धारण अहिंसात्मक व्यवहारांमुळे शक्य होत असते माता-पिता मुलगा-मुलगी भाऊ बहीण इत्यादी नातेसंबंध येता मानवी जगण्याची आंतरिक संबंध हा व्यापक प्रगती आणि अहिंसा तसेच हात परिवार समाज आणि राष्ट्र या भावी विकासासाठी मुलभूत ठरतो.
६. अहिंसे द्वारे मनुष्याची प्रतिष्ठा पूर्ण होते ते अन्याय व अत्याचाराविरुद्ध लढू शकतील आणि हे विश्व कल्याणासाठी आवश्यक आहे.
७. अहिंसे असे द्वारे सहयोग आणि सहकार्याची भावना स्थापित करणे ह्यामुळे समाजधर्म या विचाराला बळकटी मिळते.
८. अहिंसा वाचिक व मानसिक प्रवृत्ती प्रव्रूत्ती शुद्ध करते.

९. व्यक्तीची प्राथमिकता सहअस्तित्व आणि सहिष्णुता ही कोण जगातील सर्व प्राणिमात्र एक दुसऱ्या प्रति साशंकतेने पहात असतील तर संघर्ष कधी ही संपणार नाही जे अशांतीचे कारण आहे.

**संवर्धक तत्व**

गांधीजी स्वतःला एक व्यावहारिक आदर्शवादी घडवतात ते प्रत्येक जीवा प्रती अहिंसा ही विकसित करू पाहतात असे असले तरी गांधीजी मृत्यूच्या दारात असलेल्या गायीच्या बसलेला डॉक्टरांना सांगून इंजेक्शन देऊन बछड्याला आजारातून मुक्त करतात ह्या घटनेला गांधीजी हिंसा म्हणत नाहीत ते म्हणतात अधिष्ठान आपले अंतःकरण असते याचा संबंध अंतकरणाची असत नाही हे पुस्तक असूच शकत नाही, गांधीजी म्हणतात मनुष्य हा हिंसक असतो तो जेव्हा एका ठिकाणी उभा असतो त्यावेळी विश्वरचना द्वारे किंवा भोजन करताना आनंद घेताना त्या स्वरूपामध्ये हिंसा ही होतच असते गांधीजींनी एकंदरीत हिंसा या प्रकारे स्पष्ट केली आहे यास आपण हिंसा म्हणू शकत नाही व्यक्तिगत स्वार्थासाठी ग्रहण करणे यामध्ये जी हिंसा होते त्याला व्यक्तिगत स्वार्थ आहे कारण त्यातून आपल्या शरीराची रक्षा होती परमार्थ यांची केलेली हिंसा जेव्हा एखाद्या गावात आलेले हिंस्त्र पशू आपल्यास त्याची हिंसा करावीच लागते याला गांधीजी पारमार्थिक हिंसा असे म्हणतात एखाद्या प्राण्याच्या सुखशांतीसाठी एखाद्याच्या हाताला किंवा बोटाला दुखापत होऊन शरद असे की तोडणे महत्त्वपूर्ण आहे तसेच गांधीजी पुढील प्रकारच्या हिंसेला हिंसा मरत नाही शेतकऱ्यांनी वांद्रे पक्षी किडे तो यांची केलेली हिंसा ही हिस्से मध्ये मोडत नाही साध्य रोगाने रोजी च्या जगण्याची इच्छा नाही त्याची हत्या करणे हिंसा नाही उलट त्याचा मृत्यूही तयात आहे प्राण्यातील वेदनांनी तळमळणाऱ्या माणसाच्या बाबतीत हाच नियम लागू करण्याची त्याची तयारी मानवाने स्वतःच्या संरक्षणासाठी केलेली हिंसा ही आहे गांधीजी या संदर्भाने असे म्हणतात की मी वेळोवेळी सांगत आलो आहे की ही व्यक्ती मृत्यू चा सामना करत आपल्या प्रियजनांचे रक्षा व सन्मान करू शकत नाही त्यांनी काही प्रसिद्ध हिंसा करणे योग्य ठरते असे न करता जो ह्याने ग्रस्त होतो तो आपल्या परिवाराचा प्रमुख म्हणून घेण्यात गायक फरक नाही त्याने कुठेतरी लाचार पणे आपले आयुष्य जगावे.

**संदर्भ सूची**


१. माझे सत्याचे प्रयोग - महात्मा गांधी
२. गांधीजी मानव व महामानव - द. ना. गोखले
३. महात्मा गांधी - साधना प्रकाशन
४. महात्मा गांधी गौरव ग्रंथ
५. यंग इंडिया
६. महात्मा गांधी - रामचंद्र गुहा